सकाळ पु-५.१.

# प्रवाशांनी बाहेर पडायचे कसे?

## विरार रेल्वे स्थानकाबाहेर वाहतूक कोंडीचा सामना

वसई, ता. १७ (बातमीदार) : वसई विरार शहरात वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. अशात वसई, विरार आणि नालासोपारा रेल्वे स्थानकाबाहेर बेशिस्त वाहतुकीमुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे आम्ही स्थानकाबाहेर पडायचे तरी कसे, असा सवाल रेल्वे प्रवाशांकडून विचारला जात आहे. तसेच कोंडीमुळे वाहतूक व्यवस्थेवर ताण येत आहे. मात्र स्थानिक प्रशासनाकडून केवळ समस्यांची उजळणी करण्यापलीकडे काहीच केले जात नसल्याचे सर्वसामान्यांची सुरक्षा वाऱ्यावर असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

वसई-विरार शहरातील लाखो नागरिक हे रेल्वेने प्रवास करतात; पण त्यांना स्थानकातून बाहेर पडल्यानंतर घर गाठण्यासाठी मोठा प्राविडी प्राणायाम करावा लागत आहे. वाढत्या नागरीकरणामुळे शहरातील वाहनांची संख्या वाढली आहे. यात रिक्षा, टेम्पो यांचे प्रमाण अधिक आहे. सकाळी आणि सायंकाळी गर्दीच्या वेळेत येथे मोठी वाहतूक कोंडी होत असते. विरार, वसई, नालासोपारा या ठिकाणी प्रामुख्याने ही समस्या नित्याची ठरत आहे.

एकीकडे महापालिकेने पर्यायी व्यवस्था म्हणून उड्डाणपुलाचे जाळे निर्माण करण्याची घोषणा केली; परंतु त्याची अद्याप अंमलबजावणी झालेली नाही; तर दुसरीकडे रस्त्यावरील बेवारस वाहनांवर करण्यात येणारी कारवाईदेखील जैसे थे आहे. त्यामुळे रस्ते तोकडे होत असून रस्त्यांवर फेरीवाल्यांचा विळखा पडला आहे. तसेच शहरात वाहनतळांचा अभाव नसल्याने नागरिक रस्त्याच्या कडेला वाहने लावून जात असतात. त्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडत आहे. यावर महापालिका आणि वाहतूक विभागाने वाहतूक व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी कृतिशील पावले उचलण्याची गरज आहे.



विरार पूर्व परिसरात रेल्वे स्थानकाबाहेर बेशिस्त वाहतुकीमुळे कोंडी होत आहे.

### » अत्यावश्यक सेवांना फटका

रुग्णवाहिका, अग्निशमन दल, पोलिस यांसह अन्य अत्यावश्यक सेवा देणाऱ्यांना या वाहतूक कोंडीचा फटका सहन करावा लागतो. पर्यायी व्यवस्था नसल्याने त्यांना कोंडीत अडकून राहावे लागते. तसेच रुग्णांना वेळेवर उपचारासाठी रुग्णालय गाठणे कठीण होऊन बसते.

### » सिग्नल यंत्रणेचा बोजवारा

शहराची वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी म्हणून सिग्नल यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे; पण मुख्य मार्गावरची ही यंत्रणा कमकुवत झाली आहे. सात्यत्याने होणाऱ्या बिघाडामुळे येथील सिग्नल बंद असतात. त्यामुळेदेखील कोंडीला आवरणे शक्य होत नाही.

### » पालिका मुख्यालय 'कोंडी'त

वसई-विरार महापालिकेचे मुख्यालय हे विरार स्टेशनपासून काही अंतरावर आहे. या ठिकाणी पोलिस ठाणेदेखील आहे; परंतु रोज येथील मार्गावर कोंडीचा सामना करावा लागत आहे. पालिकेच्या अधिकाऱ्यांसह, पोलिसांची वाहने या कोंडीत अडकतात तरीही लक्ष दिले जात नाही.

### » फेरीवाल्यांचे अतिक्रमण

एकीकडे कोंडी होत असताना नागरिकांना चालण्यासाठी असणारे फूटपाथ फेरीवाल्यांनी व्यापले आहेत. तसेच काही ठिकाणी फेरीवाल्यांनी रस्त्यावर बस्तान मांडले आहे. त्यामुळे पादचाऱ्यांना नाईलाजाने रस्त्यावरून चालावे लागते. याकडे महापालिका प्रशासनाने लक्ष घालून फेरीवाल्यांवर कारवाई करण्याची गरज आहे.

विरार शहरात होणारी वाहतूक कोंडी पाहता नव्याने उड्डाणपुलाची निर्मिती करण्यात येणार आहे. त्यामुळे पर्यायी मार्गाची व्यवस्था नागरिकांना उपलब्ध होईल. तसेच शहरात वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महापालिकेनेदेखील कर्मचारी तैनात केले आहेत. वाहतूक पोलिसांना ते मदत करत असतात.


- राजेंद्र लाड, कार्यकारी अभियंता, महापालिका

वाहतूक व्यवस्थेवर ताण निर्माण होऊ नये म्हणून मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या वाहतूक विभागाकडून कर्मचारी व अधिकारी काम करत आहेत. तसेच अडथळे निर्माण करणाऱ्या वाहनावरदेखील कारवाई केली जात आहे.

- सागर इंगोले, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, वाहतूक विभाग

### मोकाट जनावरांचा धोका

शहरामध्ये सार्वजनिक रस्त्यांवर मोकाट व पाळीव जनावरे फिरत असतात. यामुळे समोरून येणारे वाहनचालक यामुळे बिथरतात. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अशा मोकाट जनावरांसाठी उपाययोजना करण्याची गरज आहे.



Scanned with CamScanner

पुण्यनगरी पु. पा. ७.

# भाईंदरमध्ये राष्ट्रवादीची जनजागर यात्रा दाखल

**मीरा रोड :** महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या वतीने सुरू असलेली जनजागर यात्रा सोमवारी मीरा- भाईंदर शहरात दाखल झाली. शहरातील पहिली जनजागर यात्रा सभा महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी महिला काँग्रेस प्रदेशाध्यक्षा माजी आमदार विद्या चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली, राष्ट्रवादी महिला काँग्रेस ठाणे-पालघर विभागीय अध्यक्षा ऋता आव्हाड यांच्या प्रमुख उपस्थितीत मीरा रोड येथे पार पाडली.



जनजागर सभेमध्ये जीवनाव्यशक वस्तू, पेट्रोल, डिझेल, सीएनजी दरवाढ, बेरोजगारी तसेच राज्यातील लोकशाहीला घातक असणाऱ्या घडामोडी, राज्य सरकार पाडण्यासाठी केली गेलेली कट-कारस्थाने, महिलांवर होणारे अत्याचार अशा विविध मुद्द्यांवर उपस्थित महिला व नागरिकांमध्ये विद्या चव्हाण आणि ऋता आव्हाड यांनी जनजागर यात्रेद्वारे जनजागृती केली. या जनजागर सभेला महिलांचा अतिशय उत्स्फूर्तपणे प्रतिसाद पाहायला मिळाला. मीरा-भाईंदर शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष अरुण कदम यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी महिला काँग्रेस सरचिटणीस पौर्णिमा काटकर, जिल्हा समन्वयक फ्रंटल सेल रामानंद गुप्ता व अर्बन सेल जिल्हाध्यक्ष तथा ब्लॉक अध्यक्ष अनिल साबळे तसेच इतर पदाधिकाऱ्यांनी अतिशय उत्तम प्रकारे या जनजागर सभेचे आयोजन केले. या वेळी राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा विद्या चव्हाण, राष्ट्रवादी महिला काँग्रेस ठाणे पालघर विभागीय अध्यक्षा ऋता आव्हाड, मीरा भाईंदर जिल्हाध्यक्ष अरुण कदम, महिला निरीक्षक शशिकला पुजारी, महिला प्रदेश सरचिटणीस पौर्णिमा काटकर, महिला प्रदेश सरचिटणीस अन्नू पाटील, प्रदेश सचिव अंकुश मालुसरे, प्रदेश सचिव संतोष पेंदूरकर, महिला जिल्हाध्यक्षा सुप्रिया माईनकर, वसई विरार जिल्हाध्यक्ष राजाराम मुळीक, वसई विरार महिला जिल्हाध्यक्षा अश्विनी गुरव, वसई विरार ग्रामीण जिल्हाध्यक्षा मेघा म्हात्रे, १४६ ओवळा माजिवडा युवक अध्यक्ष जक्की पटेल, जिल्हा समन्वयक फ्रंटल सेल रामानंद गुप्ता, अर्बन सेल जिल्हाध्यक्ष अनिल साबळे यांच्यासह महिला, युवक-युवती आणि इतर पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

म. टा. पु. पा. ७.

# नियमबाह्य गतिरोधक धोक्याचे

**म. टा. वृत्तसेवा, वसई**

वेगामुळे होणारे अपघात रोखण्यासाठी वसई-विरार शहरात ठिकठिकाणी बेकायदा गतिरोधक बसवण्यात आले आहेत. मात्र अनेक ठिकाणी नियमांचे उल्लंघन करत कमी-जास्त उंचीचे, वेगवेगळ्या रचनेचे गतिरोधक बसवल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन अपघातांची भीती वाढली आहे. अपघातांना आणि आजारांना निमंत्रण देणारे हे बेकायदा गतिरोधक काढण्याची मागणी होत आहे.

वसई-विरारमध्ये अनेक ठिकाणी नव्याने रस्ते बांधले जात असून, जुन्या रस्त्यांनाही झळाळी दिली जात आहे. मात्र अनेक रस्त्यांवरही नियमभंग करून, बेकायदा गतिरोधक बसवले आहेत. इंडियन रोड काँग्रेसच्या नियमाप्रमाणे, ताशी कमाल २५ किमी वेगाने वाहने जाण्यासाठी गतिरोधकाची रुंदी ३.७ मीटर व उंची ०.१० मीटर असावी. दोन गतिरोधकांमधील अंतर किमान १०० ते १२० मीटर असावे. सुरुवातीलाच इशारा देणारा फलक असावा. गतिरोधकावर काळे-पांढरे पट्टे असावेत. मात्र वसई विरारमध्ये नियमानुसार उभारलेले मोजकेच गतिरोधक आहेत. अनेक गतिरोधकांना पांढरे पट्टे नाहीत. यामुळे अनेक अपघात वसईत घडले आहेत. मध्यंतरी, एका महिलेने स्वतःच गतिरोधकावर पांढरे पट्टे रंगवल्याचेही समोर आले होते.

वाहतूक पोलिसांचा परवाना नसतानाही महापालिका राजकीय पक्षांच्या दबावाखाली मनाप्रमाणे कसेही, कोठेही गतिरोधक उभारत असल्याचा आरोप वसईतील माजी आमदार डॉमनिक गोन्साल्विस यांनी केला आहे. गतिरोधकांना विरोध नाही, पण त्यांची बांधणी आयआरसीच्या नियमावलीनुसारच झाली पाहिजे. गतिरोधकांमुळे चालक आणि नागरिकांना त्रास होऊ नये, तर सुरक्षितत वाटावे, अशी अपेक्षा गोन्साल्विस यांनी व्यक्त केली.



**बिघाडांचे शुल्ककाष्ठ**

गतिरोधकावर वाहने जोरात आदळल्यास लहान कारच्या इंजिनला झटका बसून वाहने दुरुस्तीसाठी थेट गॅरेजवरच न्यावी लागतात, असे वाहनचालक चंदन पाटील यांनी सांगितले.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी ५-मा.१

# गोपचरपाडा येथे पालिकेचा अनधिकृत इमारतीवर हातोडा



**। वसई :** विरारमधील गोपचरपाडा येथील कोकणनगर येथे प्रभाग 'सी'चे सहाय्यक आयुक्त गणेश पाटील यांनी एका अनधिकृत इमारतीवर हातोडा चालवल्याने परिसरातील अनधिकृत इमारती बांधकाम करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

विरारच्या प्रभाग 'सी'मध्ये अनधिकृत बांधकामाचे पेव फुटले आहे. त्याच्या तक्रारी पालिकेकडे करण्यात आल्या होत्या. पालिका आयुक्त अनिलकुमार पवार, अतिरिक्त आयुक्त रमेश मनाले, उपायुक्त अजित मुठे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग 'सी'चे सहाय्यक आयुक्त गणेश पाटील, कनिष्ठ अभियंता साहिल सावे, विजय गोतमारे, अश्विनी पाटील यांनी गोपचारपाडा येथे तळमजला व एक मजला इमारतीचे ३५०० चौरस फुटांचे अनधिकृत बांधकाम पोकलेनच्या सहाय्याने तोडले. तर २०० चौरस फुटांचा व्यावसायिक गाळा पाडण्यात आला.

# वीज बिल भरण्यास सांगून केलेली ऑनलाईन लूट पोलिसांनी दिली मिळवून

**। वसई ।** आम्ही वीजवितरणमधून बोलतोय तुमचे लाईट बिल आता तत्काळ भरा; अन्यथा आपला वीजपुरवठा खंडित केला जाईल, अशी बतावणी करून २६ हजारांची झालेली लूट परत मिळवण्यात नालासोपारा पोलीस ठाण्यास यश आले आहे.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत नालासोपारा परिसरातील किरण शिवराम काळसेकर यांना मोबाईलवर अनोळखी व्यक्तीने एमएसईबीमधून बोलत असल्याचे भासवून 'तुमचे राहत्या घराचे विजेचे बिल भरणे बाकी आहे. ते न भरल्यास वीजपुरवठा खंडित होईल. त्यामुळे तुमचा वीजपुरवठा चालू ठेवण्याकरता तत्काळ ऑनलाइन बिल भरा,' असे सांगून तक्रारदार यांना एक लिंक पाठवली. त्यावर त्यांची २६ हजारांची फसवणूक झाली. तक्रारदाराने लागलीच नालासोपारा पोलीस ठाणे येथे तक्रार अर्ज दाखल केला. या तक्रारीबाबत पोलीस निरीक्षक राहुल सोनवणे व परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षक योगेश मोरे यांनी तत्काळ दखल घेतली. नोडल अधिकारी यांना ई-मेल करण्यात आला होता. त्यापैकी ढअ व चे नोडल अधिकारी यांनी तक्रारदार यांची फसवणूक झालेल्या रकमेबाबत पडताळणी करून तक्रारदार यांची फसवणूक झालेली २६ हजार रुपये फ्रिज करून तक्रारदार यांच्या मूळ खात्यावर परत पाठवली. अशा प्रकारे फसवे कॉल अथवा एसएमएस प्राप्त झाल्यास त्यावर कोणताही प्रतिसाद देऊ नये. आपल्या मोबाईल क्रमांकावर प्राप्त होणारे एसएमएस, ई-मेल, कॉल्स यांची विश्वासार्हतेची पडताळणी करावी. आपल्या मोबाईलवर प्राप्त होणारा ओटीपी किंवा आपली वैयक्तिक माहिती देऊ नये. तसेच फसवणूक झाल्याचे लक्षात येताच लागलीच नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा जेणेकरून Golden Hour Period मध्ये फसवणूक झालेली रक्कम परत मिळवण्याकरता मदत होईल. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारची फसवणूक झाल्याचे आढळून आल्यास पोलीस ठाण्यास तसेच सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा १९३० या हेल्पलाइनवर संपर्क साधून तक्रार द्यावी. नालासोपारा पोलीस ठाणे शाखा संपर्क क्रमांक ८६६९६०४०२७ नालासोपारा पोलीस ठाणे ई-मेल आयडी - pi.nalasopara.mbvv@mahapolice.gov.in यावर आपली तक्रार दाखल करावी, असे आवाहन पोलीस उपायुक्त सुहास बावचे यांनी केले आहे.

Scanned with CamScanner

म. टा. पु. पा. १.

# जोशी रुग्णालयाचे कर्मचारी तीन महिने वेतनाविना

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

## डॉक्टर, कर्मचारी हवालदिल

मिरा-भाईंदरमधील शासकीय पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात मंजूर पदांच्या तुलनेत निम्म्याच कर्मचाऱ्यांवर काम भागवले जात असल्याने कर्मचाऱ्यांवर कामाचा प्रचंड भार आहे. त्यातच या कर्मचाऱ्यांचे मागील तीन महिन्यांपासूनचे वेतन रखडल्याची बाब समोर आली आहे. सरकारी सेवेतील डॉक्टरांसह चतुर्थ श्रेणी कंत्राटी कर्मचाऱ्यांचादेखील यामध्ये समावेश आहे. तब्बल तीन महिने वेतन थकल्याने 'आता घर चालवायचे कसे?' असा प्रश्न ते विचारत आहेत.

महापालिकेने भाईंदर पश्चिमेला जोशी रुग्णालयाची निर्मिती केली असली, तरी प्रचंड खर्चामुळे ते चालवणे झेपत नसल्याने रुग्णांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी २०१८ साली ते राज्य सरकारकडे हस्तांतरित करण्यात आले. या रुग्णालयात आकृतीबंधाच्या तुलनेत डॉक्टर व इतर वैद्यकीय कर्मचारी यांची केवळ ५० टक्केच पदे भरण्यात आली आहेत. त्यांच्या मदतीनेच रुग्णालयात मोठ्या शस्त्रक्रिया वगळता किरकोळ शस्त्रक्रिया व उपचार केले जात आहेत. मिरा-भाईंदरसह वसई-विरारमधील अनेक रुग्ण या रुग्णालयावर अवलंबून आहेत.

जोशी रुग्णालयात सध्या सरकारी सेवेतील ५० ते ६० कर्मचारी, तर कंत्राटी स्वरूपात १७० हून अधिक जण सेवा बजावत आहेत. यातील कंत्राटी व सरकारी सेवेतील अशा दोन्ही कर्मचाऱ्यांचे ऑक्टोबर महिन्यापासूनचे, म्हणजेच मागच्या तीन महिन्यांचे वेतन रखडले आहे. याची सर्वाधिक झळ कंत्राटी पद्धतीने चतुर्थ श्रेणीतील पदांवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना बसत आहे. या मुद्द्यावर आक्रमक होत काही कर्मचाऱ्यांनी सोमवारी रुग्णालयात ठिय्या आंदोलन सुरू केले होते. नंतर वरिष्ठ डॉक्टरांनी समजूत काढल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

वेतनासंदर्भात विविध संघटनांकडून वेळोवेळी सरकारकडे पाठपुरावा केला जात आहे. मात्र त्याची कोणतीही दखल घेतली जात नसल्याचे कर्मचाऱ्यांनी सांगितले. याचा परिणाम उपचारांसाठी दाखल होणाऱ्या रुग्णांच्या सेवेवरदेखील होत असल्याचे सांगण्यात येत आहे.

यासंदर्भात जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. जाफर तडवी यांच्याकडे विचारणा केली असता, कर्मचाऱ्यांच्या वेतनासंदर्भात वेळोवेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्कात असून पाठपुरावा केला जात आहे. रुग्णांच्या सेवेत कोणताही परिणाम होऊ दिला जात नसल्याचे त्यांनी सांगितले.




## स्वच्छतेची जबाबदारी केवळ पाच जणांवर

जोशी रुग्णालय राज्य सरकारकडे हस्तांतरित केल्यानंतर ते करोना रुग्णालय म्हणून घोषित करण्यात आले होते. त्यामुळे ऑक्टोबर २०२२ पर्यंत मिरा-भाईंदर पालिकेकडून रुग्णालयासाठी सफाई कर्मचारी पुरवले जात होते. मात्र विलंबाने वेतन मिळत असल्यामुळे कंत्राटी कर्मचारी मिळेनासे झाले. त्यामुळे रुग्ण कल्याण समितीच्या निधीतून ठोक मानधनावर केवळ पाच कर्मचाऱ्यांकडून चार मजली रुग्णालयाची साफसफाई केली जात आहे. परिणामी, शौचालयासह अन्यत्र अस्वच्छता पसरल्याने रुग्णांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. यासंदर्भात श्रमजीवी संघटनेनेही वेळोवेळी पाठपुरावा केला आहे.

Scanned with CamScanner

लोकसत्ता पु.पा.१



# नायगाव उड्डाणपुलावर अपघातांचा धोका

## कठड्याची उंची वाढविण्याची मागणी

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई:** काही महिन्यांपूर्वी तयार करण्यात आलेल्या नायगाव उड्डाणपुलाचे कठडे हे अपुऱ्या उंचीचे असल्याने अपघातांचा धोका निर्माण झाला आहे. कठड्याची उंची वाढविण्यात यावी, अशी मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.

नायगाव पूर्व पश्चिमेला जोडणारा उड्डाणपूल मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) तयार करून तो वाहतुकीसाठी खुला केला. पूलामुळे वसई-विरार ते मुंबई, ठाणे मीरा-भाईंदर या ठिकाणी प्रवास करण्याचे अंतर कमी झाले आहे. राष्ट्रीय महामार्गही जवळ असल्याने या पुलावरून होणारी वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

१.३ किलोमीटर लांबीच्या उड्डाणपूलाला एमएमआरडीएने फक्त रेल्वेवरील भागात उंच सुरक्षा कठडे बसविलेले आहेत. मात्र उर्वरित दोन्ही बाजूस व पश्चिमेकडील उतारमार्गिकेवर असलेले आर.सी.सी. सुरक्षा कठडे अत्यंत कमी उंचीचे आहेत. मार्गावरून वाहनचालक हे भरधाव वेगाने वाहने चालवितात. याशिवाय पुलावर दोन घातक वळणेही आहेत. अपघात झाल्यास कमी उंचीच्या सुरक्षा कठड्यांमुळे पुलावरून कोसळून गंभीर दुखापत किंवा जिवीतहानी होण्याची भीती आहे. सुरक्षेच्या दृष्टीकोनातून लोखंडी सुरक्षा कठडे बसविण्यात यावे अशी मागणी नागरिकांनी केली आहे. याबाबत माजी सभापती कन्हैया भोईर यांनी एमएमआरडीए प्रशासनाला सदर पुलाची पाहणी करून सुरक्षेच्या उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

### 'रिफ्लेक्टर' काढण्याचा प्रकार

नायगाव उड्डाणपुलावरून वाहनचालकांचा सुरक्षित प्रवास व्हावा व कोणत्याही प्रकारच्या अपघाताच्या घटना घडू नये यासाठी पुलावरील कठड्यावर पिवळ्या रंगाचे रिफ्लेक्टर लावण्यात आले होते. रात्रीच्या वेळेस प्रवास करताना, जेव्हा पुलावरील पथदिवे बंद असतात तेव्हा कठड्याची दिशा ओळखण्यासाठी ते फायदेशीर ठरतात. परंतु आता काही ठिकाणी हे रिफ्लेक्टर काढून टाकण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे.

### 'ब्लिंकर' बसविण्याची मागणी

नायगाव उड्डाणपुलावर वाहनांची वर्दळ अधिक प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे पुलाच्या दोन्ही ठिकाणच्या उतार मार्गावर ब्लिंकर बसविण्याची गरज निर्माण झाली आहे. अनेक वाहने उतार मार्गाच्या ठिकाणावरून वळण घेतात यामुळे भरधाव वेगाने येणाऱ्या वाहनांची धडक लागण्याची शक्यता आहे. जर ब्लिंकर लावले तर वेग नियंत्रण करता येऊ शकेल.

Scanned with CamScanner

लोकसत्ता पु-पा-१

# अंतर्गत प्रवेशद्वाराऐवजी महामार्गावर प्रवेशद्वार

**लोकसत्ता, विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई, विरार शहरातील अंतर्गत प्रवेशद्वारांऐवजी महामार्गावर दोन ठिकाणी प्रवेशद्वार उभारण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे. अंतर्गत प्रवेशद्वारांना नागरिकांनी विरोध केल्याने पालिकेने तो प्रस्ताव तूर्तास स्थगित ठेवला आहे. महामार्ग प्राधिकरणाच्या परवानगीनंतर प्रवेशद्वाराचा प्रस्ताव तयार केला जाणार आहे.

वसई, विरार, नालासोपारा आणि नायगाव अशी चार शहरे आहेत. या शहरातून आत येण्यासाठी वालीव, सातिवली, पेल्हार आणि विरार असे चार प्रवेश मार्ग आहेत. या मार्गातून शहरात प्रवेश करताना कसलीच ओळख नव्हती. प्रवेश मार्ग ओसाड आणि रूक्ष होते.

पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी या प्रवेशद्वारांना ओळख देण्याचा निर्णय घेतला होता. एकूण चार मार्गावर चार वेगवेगळी संकल्पचित्रे निश्चित करण्यात आली होती. प्रवेशद्वारांचा एकूण खर्च पाच कोटी रुपयांचा होता. वसईच्या संस्कृतीचे प्रतिक या प्रवेशद्वारातून साकारण्याचा पालिकेचा प्रयत्न होता. मात्र या अंतर्गत प्रवेशद्वारांना नागरिकांनी विरोध केला होता. प्रवेशद्वाराऐवजी शहरातील समस्या दूर कराव्या, अशी मागणी नागरिकांनी केली होती. या विरोधामुळे पालिकेने अंतर्गत प्रवेशद्वार उभारण्याचा निर्णय तूर्तास स्थगित केला आहे. त्या ऐवजी महामार्गावर पालिकेच्या हद्दीत दोन ठिकाणी प्रवेशद्वार उभारण्याचे ठरवले आहे.

**ठिकाणे :-**
**शिरसाड, ससूननवघर**

मुंबई-अहमदाबाद महामार्गावर शिरसाड येथून आणि घोडबंदरजवळील ससून नवघर येथून वसई-विरार महापालिकेची हद्द सुरु होते. या दोन्ही ठिकाणी ही प्रवेशद्वार उभारण्याचे विचाराधीन असल्याचे पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी सांगितले.

लोकसत्ता पु-पा-४

# नालासोपारा-विरार रस्त्यावर सुरक्षेच्या उपाययोजना

## वसई-विरार महापालिकेची माहिती

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** सोयीसुविधांअभावी धोकादायक बनलेल्या नवीन विरार-नालासोपारा रस्त्यावर पालिकेकडून आता विविध प्रकारच्या उपाययोजना करण्यात येणार आहेत.

नालासोपारा पश्चिमेच्या श्रीप्रस्थ ते विरारच्या म्हाडा कॉलनीदरम्यान पालिकेने नवीन रस्ता तयार केला आहे. त्यासाठी पालिकेने आठ कोटी रुपये खर्च करून १५ मीटर रुंद आणि १६०० मीटर (१.६ किलोमीटर) लांब रस्ता तयार करण्यात आला आहे. या रस्त्यामुळे विरार ते नालासोपारा या दरम्यानचा प्रवास अवघ्या पाच मिनिटांत करणे शक्य झाले आहे, परंतु या रस्त्यावर पालिकेकडून सुरक्षेच्या दृष्टीने कोणत्याच सोयीसुविधा न दिल्याने हा रस्ता धोकादायक बनला आहे.

हा रस्ता अतिशय मोकळा असल्याने या भागातून प्रवास करणाऱ्या व फेरफटका मारण्यासाठी येणाऱ्या नागरिकांची संख्या वाढली आहे. दुचाकीस्वार भरधाव वेगाने वाहने चालवीत असतात याचा फटका येथून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना बसत आहे. नुकताच या रस्त्यावर आठ वर्षांच्या चिमुकल्याचा दुचाकीच्या धडकेत मृत्यु झाला होता.

या घटनेनंतर या रस्त्यावर तातडीने पालिकेने सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांनी केली होती. अखेर पालिकेने या रस्त्यावर तातडीने उपाययोजना करण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे.

पथदिवे, दिशादर्शक पट्टे, दुभाजक, कॅट आय रिफ्लेक्टर आदी सुविधा पुरवल्या जाणार आहेत. येत्या १५ दिवसांत या सर्व उपाययोजना पूर्ण झाल्या पाहिजेत, अशा सूचना ठेकेदार व अधिकारी यांना देण्यात आले आहेत, असे महापालिकेचे आयुक्त अनिलकुमार पवार यांनी सांगितले आहे.

Scanned with CamScanner

# अपघाताला निमंत्रण देऊ नका

## वाहतूक पोलिस निरीक्षक सागर इंगोले यांचे आवाहन

वसई, ता. १७ (बातमीदार) : वाहन चालवताना निष्काळजीपणा तसेच नियमांचे उल्लंघन केल्यास अपघात घडून मृत्यू किंवा गंभीर दुखापतीला सामोरे जावे लागते. त्याशिवाय स्वतःच्या व इतरांच्या सुरक्षेची काळजी घेतली पाहिजे. विनाकारण अपघाताला निमंत्रण देण्याचे धाडस करू नका. वाहने सावकाश चालवा, असे आवाहन येथील वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सागर इंगोले यांनी वसईत केले.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्त मधुकर पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली वसईत रस्ते सुरक्षा अभियान हाती घेण्यात आले आहे. त्यानिमित्त वसई सनसिटी येथील वाहतूक विभागीय कार्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी माजी सभापती वृंदेश पाटील, माजी नगरसेवक कल्पेश मानकर, सहायक पोलिस निरीक्षक विनोद जाधव, उपनिरीक्षक तानाजी चौगुले, चंद्रकांत सातपुते यांच्यासह वाहतूक विभागाचे अधिकारी, कर्मचारी व नागरिकांनी सहभाग घेतला होता. दीपप्रज्वलनाने अभियानाला सुरुवात करण्यात आली.

वेगमर्यादेचे पालन, गतिरोधकांची माहिती, सिग्नल नियम, अपघात रोखण्यासाठी उपाययोजना, फलक जागरूकता तसेच वाहन चालवताना कोणती काळजी घेतली पाहिजे याची माहिती या वेळी इंगोले यांनी दिली. आज सर्वाधिक अपघात हे वाहनांचे नियम न पाळल्यामुळे होत आहेत. त्यामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली आहेत. आपले कुटुंबीय, सदस्य आपली वाट पाहत आहेत याची जाणीव वाहनचालकांनी ठेवून वाहन चालवावे, असे आवाहन इंगोले यांनी केले. या वेळी पोलिस कर्मचारी राजू गायकवाड यांनी प्रास्ताविक करून आभार मानले.

## डहाणूत रस्ता सुरक्षा सप्ताहाला सुरुवात

कासा, ता. १७ (बातमीदार) : पालघर जिल्हा वाहतूक शाखा पालघर यांच्यामार्फत ११ जानेवारी ते १७ जानेवारीपर्यंत रस्ते सुरक्षा सप्ताह सुरू करण्यात आला आहे. त्यासाठी डहाणू येथील के. एल. पोंदा हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये अभियानाची सुरुवात करण्यात आली. या वेळी डहाणू तालुक्यातील महाविद्यालयाचे विद्यार्थी तसेच रिक्षा चालक-मालक उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी वाहतूक शाखेचे प्रभारी अधिकारी डॉ. आरिफ बेग यांनी वाहन चालवण्यासंबंधी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी तहसीलदार अभिजित देशमुख, राजेंद्र वळवी, के. एल. पोंदा हायस्कूलचे प्राचार्य एन. इंगळे, महिला पोलिस उपनिरीक्षक एस. सांगळे, मनसे डहाणू तालुकाप्रमुख विपुल पटेल, महिला शिवसेना तालुकाप्रमुख उज्ज्वला डामसे तसेच डहाणू पोलिस ठाण्याचे अंमलदार उपस्थित होते.

Scanned with CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 26 अंक-215 मुंबई, बुधवार 18 जनवरी 2023 पृष्ठ-12 मूल्य : 2.00

# ऑनलाइन बिजली बिल भरने के नाम पर धोखाधड़ी

**वसई :** बिजली बिल फर्जी, 26 हजार रुपये वापस दिलाने में नालासोपारा पुलिस को एक बड़ी कामयाबी मिली है, पुलिस ने बताया कि ए/104 इंद्रप्रस्थ, एसटी स्टैंड रोड, नालासोपारा पश्चिम स्थित किरण शिवराम काल्सेकर का बिजली बिल बकाया है, ऐसा बताकर एक लिंक भेजा गया, अगर भुगतान नहीं किया गया तो बिजली की आपूर्ति बंद कर दी जाएगी तत्काल ऑनलाइन बिल का भुगतान करने को कहा गया है, उक्त लिंक को शिकायतकर्ता द्वारा TeamViewer एप्लिकेशन के माध्यम से खोला, अज्ञात शख्स ने शिकायतकर्ता के बैंक खाते से पहले 26,000/- रुपये और फिर 8,300 रुपये ट्रांसफर किए, जैसे ही शिकायतकर्ता को संदेश मिला कि शिकायतकर्ता के खाते से कुल 34,300/- रुपये डेबिट हो गए हैं। शिकायतकर्ता ने तुरंत नालासोपारा पुलिस स्टेशन में शिकायत दर्ज कराई। पुलिस निरीक्षक राहुल सोनवणे एवं परिवीक्षाधीन पुलिस उप निरीक्षक योगेश मोरे ने उक्त शिकायत के संबंध में शिकायतकर्ता का तत्काल संज्ञान लिया, जांच में पता चला कि शिकायतकर्ता की फर्जी रकम पहले ऑनलाइन पेमेंट गेटवे PAY UT LUDO KING में गई, PAY U और LUDO KING के नोडल अधिकारी से संपर्क करने के बाद 26,000/- को फ्रीज कर शिकायतकर्ता के खाते में वापस भेज दिया गया है।




वही यदि आपको इस तरह की धोखाधड़ी वाली कॉल या एसएसएस प्राप्त होती है, तो इसका जवाब न दें।

अपने मोबाइल पर प्राप्त ओटीपी या अपनी निजी जानकारी न दें। इसके अलावा, जैसे ही आपको धोखाधड़ी का पता चलता है, निकटतम पुलिस स्टेशन से संपर्क करें ताकि गोल्डन आवर अवधि के दौरान धोखाधड़ी की राशि की वसूली में मदद मिल सके। साथ ही www.cybercrime.gov.in या 1930 हेल्पलाइन पर संपर्क कर शिकायत करें।

Scanned with CamScanner

सुप्रीम कोर्ट ने पूछा, दिल्ली के लिए सख्ती क्यों नहीं ▸FP
NBT
नवभारत टाइम्स
पीएम मोदी ने कार्यकर्ताओं से कहा, हर वर्ग तक पहुंचें ▸FP

# बिना लाइसेंस के गाड़ी चलाई, करोड़ों का दंड

■ **अमित तिवारी, मीरा-भाईंदरः** वसई विरार महानगर पालिका (एमवीवीवी) क्षेत्र में यातायात नियमों का उल्लंघन करनेवालों ने ट्रैफिक विभाग की तिजोरी भर दी है। विगत वर्ष 2022 में ट्रैफिक नियमों को तोड़ने वाले एक लाख से अधिक वाहनचालकों के चालान काटे गए और इनसे 5 करोड़ रुपये से अधिक का जुर्माना वसूला गया है। जुर्माना भरनेवालों में सबसे आगे बिना बेल्ट के ड्राइविंग करने वाले चालक रहे हैं। इसके अलावा, बिना लाइसेंस के गाड़ी चलानेवालों से भी जमकर जुर्माना वसूला गया।

ट्रैफिक विभाग के अनुसार, पिछले साल कुल 27,465 वाहन चालकों को बिना सीट बेल्ट के ड्राइविंग करने पर चालान किया गया। इन लोगों से लगभग 55 लाख रुपये का जुर्माना वसूल किया गया, जबकि बिना लाइसेंस के गाड़ी चलानेवालों ने 1.35 करोड़ रुपये का जुर्माना भरा है। काशीमीरा विभाग के पीआई देवीदास हंडोरे ने बताया कि ट्रैफिक विभाग लगातार जागरूकता अभियान चला रहा है। सड़कों पर विशेष ड्राइव भी चलाई जाती है। विगत वर्ष बिना हेलमेट वाहन चलाने वाले 2234 लोगों पर कार्रवाई की गई थी। शराब पीकर गाड़ी चलाने वाले 1000 से अधिक लोगों पर जुर्माना लगाया गया। रैश ड्राइविंग, ट्रिपल सीट, पार्किंग, सिंग्नल जंपिंग के मामले में 2724 लोगों के चालान काटे गए हैं।



वाहनचालकों के खिलाफ कड़ी कार्रवाई करते हुए अधिकारी।

**1431 लोगों के लाइसेंस होंगे निरस्त**

बार-बार यातायात नियम तोड़ने वालों पर ट्रैफिक विभाग की खास नजर है। ऐसे 1431 लोगों का लाइसेंस निरस्त करने के लिए विभाग ने आरटीओ को पत्र लिखा है।

Scanned with CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 26 अंक-215 मुंबई, बुधवार 18 जनवरी 2023 पृष्ठ-12 मूल्य : 2.00

# अनधिकृत निर्माण व फेरीवालों पर मनपा की कार्रवाई



**विरार :** मंगलवार को वसई विरार शहर महानगरपालिका कमिश्नर अनिल कुमार पवार व अतिरिक्त आयुक्त रमेश मनाले के आदेशानुसार उपायुक्त अजीत मुठे (अतिक्रमण विभाग) के मार्गदर्शन में वार्ड समिति 'सी' चंदनसार में अनाधिकृत निर्माणों के खिलाफ तोड़क की कार्रवाई की गई और प्रधान कार्यालय क्षेत्र में फेरीवालों के खिलाफ भी कार्रवाई की गई। वार्ड समिति 'सी' के तहत गोपचार पाड़ा में 3500 वर्ग फीट का एक भूतल + एक मंजिल का भवन पोकलेन की मदद से तोड़ू कार्रवाई की गयी। साथ ही 200 वर्ग फुट के एक अनधिकृत गाला के निर्माण को भी तोड़ दिया गया, इसी तरह विभाग ने मनपा विरार क्षेत्र में भी अनाधिकृत फेरीवालों के खिलाफ कार्रवाई की, उक्त कार्रवाई प्रभाग एएमसी गणेश पाटिल, कनिष्ठ अभियंता साहिल सावे व अतिक्रमण विभाग प्रमुख विजय गोतमारे आदि कर्मचारी उपस्थित थे, मनपा पी.आर.ओ गणेश पाटिल ने बताया कि इस अभियान में कुल 3700 वर्ग फीट तक के अनाधिकृत निर्माणों को तोड़ा गया और अतिक्रमण हटाया गया।

Scanned with CamScanner

# MBVV cops net ₹5cr as traffic fines in 2022

SURESH GOLANI
MIRA-BHAYANDAR

The traffic control department (Kashimira wing) of the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police has collected a whopping Rs5.09 crore as fines from 1,24,476 motorists who were involved in various traffic-related offences last year.

According to traffic department statistics, motorists caught driving without seat belts topped the list with 27,465 cases (Rs54.91 lakh) followed by 2,334 helmetless bikers (Rs4.95 lakh) caught driving or riding under the influence of alcohol. Other violations include parking vehicles in no-parking spots, creating traffic snarls, rash driving, jumping signals, triple seat bike riding and speeding. Additionally, 2,724 people were found driving without licenses and slapped with fines amounting Rs1.35 crore.



"Our drives and special awareness campaigns under the supervision of Commissioner Madhukar Pandey and other senior officials will continue throughout the year to encourage motorists to follow traffic rules," said newly appointed chief of traffic (Kashimira unit) police inspector Devidas Handore. Meanwhile, unpaid fines amount to another Rs1.22 crore, taking the total amount of penalties to Rs6.32 crore.

As a part of the 'one state, one e-challan' initiative which aims to integrate traffic law enforcement across the state, the traffic police personnel are armed with e-challan devices supported by a global positioning system (GPS) feature which enables the e-challan system to collect fines from traffic rule violators on the spot.

Apart from imposing penalties, the traffic police have also sent a proposal to the Regional Transport Office (RTO) recommending the suspension of driving licenses of 1,431 people for frequently violating the Motor Vehicles Act.

THE FREE PRESS JOURNAL
Tue, 17 January 2023
https://epaper.freepressjournal.in/c/71438878

Scanned with CamScanner

लोकमत

# कडी-कोयंडा उचकटून चोरी

नालासोपारा : येथे दरवाजाचा कडी-कोयंडा उचकटून घरफोडी करत दागिन्यांची चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. हनुमान नगर येथील पारस अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या नीलेश डिंगणकर (३२) यांच्या घरी सोमवारी सकाळी नऊच्या सुमारास चोरट्यांनी घराच्या दरवाजाचा कडी-कोयंडा उचकटून आत प्रवेश करत सोन्याचे मंगळसूत्र, हार, सोन्याची चेन, अंगठी, ब्रेसलेट, झुमके, नथनी असा २ लाख ८ हजार २०० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेला आहे. सोमवारी नालासोपारा पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

Mumbai Main
Page No. 7 Jan 18, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

वसईतील पोलिस ठाण्यात शेकडो अर्ज दाखल

# शिकला, सवरला; पण हुंड्यासाठी छळ सुरूच

मंगेश कराळे

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : मुलीच्या लग्नात हुंडा द्यायला पैसे नाहीत म्हणून आई-वडील अन् वडिलांच्या डोक्यावरील ओझे कमी व्हावे म्हणून अनेक मुली आजही आपली जीवनयात्रा संपवत आहेत. हुंडाबळीविरोधात कायदा होऊनही परिस्थितीत फारसा बदल झालेला दिसत नाही. हुंड्यासाठी छळ झाल्याच्या पोलिस दप्तरी नोंदवण्यात आलेल्या आकडेवारीवरून हे धक्कादायक चित्र स्पष्ट होते.

जानेवारी ते ऑक्टोबर या दहा महिन्यांत वसईतील दहा पोलिस ठाण्यांत शेकडो अर्ज दाखल झालेल्या प्रकरणांची चौकशी केली असून, यात काही जोडपी समजुतीने पुन्हा संसारात रमली आहेत. तर काहींनी कोर्टात न्यायासाठी धाव घेतली असून, आतापर्यंत १८ जणांवर गुन्हे दाखल आहेत. कर्ज काढून लग्न लावून दिले तरीही पैसे आणि विविध वस्तूंसाठी मागणी, कोणत्या कारणावरून संशय असे प्रकार यात होतात.



## हुंडाविरोधी कायदा काय?

हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१च्या कलम ३ अन्वये हुंडा देणाऱ्याबद्दल किंवा घेण्याबद्दल कमीत कमी पाच वर्षांचा कारावास आणि कमीत कमी १५ हजार रुपयांची रोख रक्कम अथवा हुंडा जेवढा आहे, तेवढी रक्कम दंड म्हणून देण्याची तरतूद केलेली आहे. हा कायदा कागदावरच असून, देशात अनेक ठिकाणी लग्नामध्ये हुंडा घेतला जातो.

## हुंड्यासाठी छळाच्या अनेक तक्रारी

वसई-विरारमधील विवाहित महिलांवर हुंड्यासाठी अत्याचाराचे प्रकार सुरूच आहेत. वेगवेगळ्या पोलिस ठाण्यात स्त्री अत्याचाराचे गुन्हे दाखल होत असतात. यामुळे एक प्रकारे सासरच्या मंडळीच्या अपेक्षांमध्ये नवऱ्याला जणू विकल्याचे दिसून येत आहे.

## हुंडा नको, मुलीच्या अंगावर सोने हवे

आम्हाला हुंडा नको; पण मात्र तुमच्या मुलीसाठी दागिने, गाडी, प्लॉट, फ्लॅट, बंगला तेवढा द्या अशीच संस्कृती आता उच्चशिक्षित कुटुंबात रुजायला लागली आहे. हुंडाबंदी कायद्याच्या साठीनंतरही समाजाला लागलेली ही कीड हद्दपार होत नाही.

## काही जण स्वीकारतात मृत्यूचा मार्ग

सासरकडून होणारा छळ सहन करताना मानसिक कोंडीत सापडलेली महिला वेळप्रसंगी मृत्यूला कवटाळते; तर काही जणी धाडस करून पोलिसांत तक्रार दाखल करतात. यातून हुंडा आणि छळाची व्याप्ती समोर येते.

## 'अशांना तुरुंगात पाठवले पाहिजे'

हुंडा मागणारा मुलगा आपल्या मुलीवर प्रेम कसे करेल, त्याचे तर पैशांवर प्रेम आहे, असे मुलीच्या आई-वडिलांनी समजले पाहिजे. हुंडा मागणाऱ्या मुलाला व त्याच्या कुटुंबीयांना तुरुंगाची हवा दाखविणे गरजेचे आहे.
-स्नेहलता सुराणा, वकील, सामाजिक कार्यकर्ता

क्षुल्लक कारणावरून सासरी विवाहितेचा छळ होतो. त्यातच पती-पत्नीत बेबनाव निर्माण होत वादाची ठिणगी पडते आणि घटस्फोटापर्यंत निर्णय पोहोचतो. अशावेळी महिलांना समुपदेशन करून कायदेशीर सल्लाही दिला जातो.
- पोलिस प्रशासन



Scanned with CamScanner

लोकमत

## नागरिक त्रस्त : कचऱ्याचे ढीग, उघड्या गटारांमुळे दुर्गंधी

# वसई-विरार समस्यांचे आगर!

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** वसई-विरार पालिका परिसरात अनधिकृत बांधकामे, नाल्यांची किंवा गटारांची साफसफाई न होणे, रस्त्याच्या कडेला असलेले कचऱ्याचे ढीग, फूटपाथवरील तुटलेली गटारांची झाकणे या समस्या कायम आहेत. पावसाळा असो की उन्हाळा रस्त्याच्या बाजूला कचऱ्याच्या ढिगाऱ्यातील दुर्गंधीमुळे सामान्य नागरिक त्रस्त आहेत.

वसई-विरार महापालिकेतील नालासोपारा शहरात बहुतेक भागात उघडे नाले व गटारांची झाकणेही उघडी आहेत. तर काही भागातून नाले गेले आहेत, तर आजूबाजूला झाडेझुडपे असल्याने सकाळ-संध्याकाळ डासांचा उपद्रव वाढतच असतो. सुरुवातीला दररोज पालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून औषधाची फवारणी केली जात होती, तर डास नियंत्रणात आणण्यासाठी व डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी पालिकेने कीटक निर्मूलन पद्धतीचाही वापर केला आहे, मात्र डासांची समस्या काही केल्या नियंत्रणात येत नसल्याचे दिसून आले आहे. यासाठी शहरातील उघडी गटारे, नाले असलेल्या परिसरात दररोज औषध फवारणी होणे आवश्यक आहे.

पावसाळा सुरू होण्यापूर्वी वसई-विरार मनपाच्या हद्दीतील नाल्यांच्या साफसफाईला सुरुवात होते. विशेषतः नालासोपारामध्ये नालेसफाई न केल्यास दरवर्षीप्रमाणे या वर्षीही पूरस्थिती निर्माण होणार आहे. लोकसंख्या वाढल्यामुळे बांधकामे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. त्यामुळे आता पाण्याचा निचरा होण्यासाठी किंवा जाण्यासाठी जागाच उरलेली नाही. यामुळे नालेसफाई वेळेवर झाली नाही तर नालासोपाऱ्यात पूरस्थिती निर्माण होणार आहे.

पावसाळ्यापूर्वी नाल्यांच्या सफाईसाठी नऊ प्रभागासाठी ठेके दिले जातात. मनपा शहरातील लहान, मोठे आणि गटारांची दरवर्षी करोडो रुपये खर्च करून सफाई करून घेते. नालासोपाऱ्यातील काही परिसर दरवर्षी पूर्णतः पाण्याखाली असतो. त्यामुळे नालेसफाई न झाल्यामुळे पावसाळ्यात विविध साथीच्या आजारांना निमंत्रण मिळते व नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. गाळ काढण्याचे कंत्राट ज्या ठेकेदाराला दिले जाते, तो वेळेवर काम पूर्ण करत नाही. अनेकदा नाल्यातून काढलेला गाळ बाजूला काढून ठेवतात, पण पावसामुळे तो गाळ परत नाल्यात जातो.




वसईत वाढत्या लोकवस्तीमुळे चाळींची बांधकामे मोठ्या संख्येने झालेली आहेत. वसई पूर्व भागातील स्थिती.

### तबेल्यांमुळे वाढली डोकेदुखी

- मनपा हद्दीतील पेल्हार, धानिवबाग, संतोष भवन, बिलालपाडा, वालीव या प्रभागात असलेल्या तबेल्यांमुळे नालेसफाई करताना डोकेदुखी बनले आहे.
- अंदाजे ८ ते १० तबेल्यांमधील अवशेष गटारात व नाल्यात जाऊन जाम होण्याचे मुख्य कारण आहे. तबेल्यांमधील शेण हे सरळ सरळ नाल्यात सोडले जाते.

### ईटीडी पावडरचा तुटवडा

वसई तालुक्यातील चारही शहरांची लोकसंख्या लाखोंच्या घरात आहे. प्रत्येक विभागात कचऱ्याच्या गाड्या कचरा गोळा करण्यासाठी जातात. पण कचरा उचलून झाल्यावर ईडीटी पावडर रोगराई, दुर्गंधी आणि घाण पसरू नये म्हणून मारावी लागते. पण खूपच थोड्या प्रमाणात पावडर स्वच्छता विभागात असते.



Scanned with CamScanner

लोकमत

# बनावट नोटांचे कनेक्शन मालाड टू वसई

## नायगावमधून आरोपीला पकडले : चाळीत सुरू होते काम

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** नायगावच्या चिंचोटी परिसरात बनावट नोटा छापून त्या मालाड शहरात वितरित करताना पोलिसांनी एका आरोपीला पकडले आहे. यापूर्वीही नकली नोटा छापण्याचा कारखाना ठाण्याच्या दहशतवादी पथकाने उघडकीस आणून पर्दाफाश केला होता. वसईतील महामार्गावर शांत भाग म्हणून ओळख असलेल्या चिंचोटी येथे पुन्हा बनावट नोटा छापण्याचा कारखाना आढळून आल्याने खळबळ उडाली आहे.

मालाडच्या मालवणी येथे रिक्षा पार्किंग, अंबुजवाडी येथे बनावट नोटा वितरित करण्यासाठी आरोपी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी सापळा रचून हनिफ शेख (वय ३३) याला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे ६० हजार रुपये किमतीच्या २०० रुपये दराच्या ३०० बनावट नोटा मिळाल्या आहेत. आरोपी हनिफ हा नायगावच्या चिंचोटी परिसरातील करमलपाडा येथील चाळीत राहत होता. मालवणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली.

पोलिसांनी आरोपीच्या मोबाइलचे कौशल्यपूर्ण विश्लेषण करून नायगाव येथील घरातून बनावट नोटा छपाई करण्याकरिता लागणारे साहित्य (संगणक, कलर प्रिंटर, लॅमिनेशन मशिन, हेअर ड्रायर, कोरे बटर पेपर, एका बाजूने नोट छपाई केलेला पेपर, कटर, पट्टी, डिंक, पेनड्राईव्ह, कार्डरीडर) जप्त केले आहे. 2020 साली डिसेंबर महिन्यात वसईतील चिंचोटीच्या परिसरात भारतीय चलनातील बनावट नोटा प्रिंटरच्या साहाय्याने बनवत असल्याची माहिती ठाण्याच्या दहशतवादविरोधी पथकाला मिळाली होती.

Hello Vasai
Page No. 1 Jan 18, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

# आकडा टाकून वीज घ्याल तर गुन्हा!

## कल्याण परिमंडळांतर्गत वीजचोरांविरोधात महावितरणची कारवाईची मोहीम सुरूच

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** वीजचोरी हा गंभीर सामाजिक आणि जबर शिक्षा व दंडाची तरतूद असलेला फौजदारी गुन्हा आहे. महावितरणच्या कल्याण परिमंडलात वीज चोरांविरूद्ध सातत्याने कारवाईची मोहीम सुरू आहे. थकीत वीज बिलापोटी वीजपुरवठा खंडित करून वीज मीटर काढल्यानंतरही थेट वीजचोरी, मीटरमध्ये फेरफार करून अथवा मीटरकडे येणाऱ्या केबलला टॅपिंग करून मीटर टाळून परस्पर वीजवापर आदी प्रकार आढळून येत आहेत. अशा प्रकरणांमध्ये वीज कायदाअन्वये गुन्हे दाखल केले जातात. थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित केल्यानंतर शेजारी किंवा इतरांकडून वीजपुरवठा घेतला असेल तर अनधिकृत वीजवापर प्रकरणी दंडात्मक कारवाई करण्यात येते.



### विविधप्रकारे वीजचोरी

- एप्रिल ते डिसेंबर या कालावधीत मीटरमध्ये फेरफार, मीटरकडे येणाऱ्या केबलला टॅपिंग, थेट वीजचोरी करणाऱ्या हजारो जणांवर कारवाई करण्यात आली आहे.
- **मंजूर भारापेक्षा अधिक भार, ज्या कारणासाठी वीजजोडणी घेतली त्याव्यतिरिक्त इतरत्र वीजवापर, शेजारी या इतरांना वीज देणे अशा अनधिकृत वीजवापर प्रकरणी कारवाई करण्यात आली.**

### ९ महिन्यांत २,१०८ जणांवर कारवाई

- वसई मंडल कार्यालयांतर्गत एप्रिल ते डिसेंबर दरम्यान २,१०८ जणांविरुद्ध कलम १३५ नुसार कारवाई करून सुमारे ६ कोटी १८ लाख रुपये किमतीची ४३ लाख २५ हजार युनिट विजेची चोरी उघडकीस आणण्यात महावितरणच्या पथकांना यश आले आहे.
- यातील ८४५ जणांना ४३ लाख १४ हजार रुपयांचा दंडही आकारण्यात आला असून ३१८ जणांविरुद्ध पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याशिवाय ७०६ ग्राहकांकडे सुरू असलेला १ कोटी ७८ लाख रुपयांचा विजेचा अनधिकृत वापर केला आहे.

### ३ कोटी ७५ लाख वसूल



वीजचोरीच्या २, १०८ प्रकरणांपैकी १ हजार ५४ प्रकरणात ३ कोटी ७५ लाख रुपयांच्या वीजचोरीच्या देयकांची वसुली झाली आहे. अनधिकृत वीजवापर प्रकरणी २१८ ग्राहकांकडून ७६ लाख ५६ हजार रुपयांचा भरणा झाला आहे.

### महावितरणचे ६ कोटी १८ लाखांचे नुकसान

कलम १३५ प्रमाणे कारवाई केलेल्या वीजचोरीच्या गुन्ह्यातील २ हजार १०८ जणांनी महावितरणचे ६ कोटी १८ लाख रुपयांचे नुकसान केले. याशिवाय कलम १२६ अन्वये कारवाई झालेल्या ७०६ जणांनी १ कोटी ७८ लाख रुपयांची वीज अनधिकृतपणे वापरली.

### ३ कोटी २३ लाखांची थकबाकी

२ हजार १०८ जणांपैकी १ हजार ५४ जणांनी चोरीच्या विजेचे देयक भरले आहे. उर्वरित ग्राहकांकडून ३ कोटी २३ लाख रुपयांचे वीज चोरीचे देयक अजूनही वसूल होणे बाकी आहे. याशिवाय अनधिकृत वीजवापर प्रकरणी ४०८ जणांकडून १ कोटी १ लाख रुपये वसूल होणे बाकी आहे.

### सुलभ वीजजोडणी घ्यावी

वीजचोरीच्या गुन्ह्यात तीन वर्षांपर्यंतचा कारावास आणि जबर दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून महावितरण ग्राहकांच्या वीज वापराचे विश्लेषण करते. त्यामुळे संबंधितांनी कोणतीही युक्ती वापरून वीजचोरीचा प्रयत्न करू नये. सुलभरित्या वीजजोडणी घ्यावी. - महावितरण

Hello Vasai
Page No. 3 Jan 18, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner